**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsakola@yahoo.com**

**अकोला कृषी हवामान सल्ला** **मंगळवार दिनांक – ०३.१२.२०१९**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक ०४ ते ०८ डिसेंबर, २०१९) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | ०४/१२ | ०५/१२ | ०६/१२ | ०७/१२ | ०८/१२ |
| पाऊस (मिमी) | ००.० | ००.० | ००.० | ००.० | ००.० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३१ | ३१ | ३१ | ३२ | ३१ |
| किमान तापमान (अं.से.) | १६ | १६ | १६ | १६ | १७ |
| ढग स्थिती (आकाश) | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७० | ७२ | ७२ | ७५ | ७५ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६० | ६२ | ६० | ५८ | ५८ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | ३ | ३ | २ | २ | २ |
| वा-याची दिशा | १०३ | ९० | १२० | ११० | १०९ |

| हवामानाचा इशारा | सध्यस्थितीत जिल्यात दिनांक ०४ ते ०८ डिसेंबर रोजी हवामान बहुतेक ठिकाणी कोरडे राहील. | |
|---|---|---|
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| सर्व पिक | पेरणी | रब्बी पिकांची पेरणी बहुतांश ठिकाणी आटोपली आहे, तरी पाण्याच्या उपलब्ध साठ्यानुसार पिकाच्या नाजूक अवस्थेत संरक्षित ओलीत द्यावे. |
| कपाशी | पात्या / बोंड | कापूस वेचताना स्वच्छ कापूस वेचावा व सुखलेल्या जागी साठवणूक करावी. जिथे सिंचनाची सोय आहे तिथे शक्य तोवर तुषार सिंचन पद्धतीने संरक्षित ओलित करावे. गुलाबी बोंड अळीचे प्रमाण बोंड, पात्या, फुलांमध्ये प्रादुर्भाव ५ ते १० टक्के दिसून येताच इंडोक्झाकार्ब १५.८ टक्के १० मि.लि किंवा क्विनॉलफॉस २५ टक्के ए एफ २५ मि.लि किंवा क्लोरपायरीफॉस २० टक्के प्रवाही २५ मि.लि प्रती १० लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी. गुलाबी बोंड अळीचे प्रादुर्भाव १० टक्क्या पेक्षा अधिक आल्यास इमामेक्टीन बेंझोएट (५ टक्के दाणेदार) ४ ग्रॅम किंवा प्रोफेनोफॉस (४० टक्के) + सायपरमेथ्रीन (४ टक्के) २० मिलि प्रती १० लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी. |
| तूर | फुल धारणा अवस्था | तूर पिकावरील पाने गुंडाळणारी अळीच्या नियंत्रणासाठी ५ % निंबोळी अर्काची फवारणी तातडीने प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून फवारणी करावी किंवा वातावरणात पुरेशी आर्द्रता असतांना पर्यावरणनिष्ठ व्यवास्थापनासाठी मेटारायझीयम अनिसोपली ५० ग्रॅम (२ x १०⁸ CFU) ग्रॅम किंवा ब्यूव्हेरिया बॅसीयाना १.१५ टक्के (२ x १०⁸ CFU) ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी. |
| गहू | वाढ | मर्यादित पाणी पुरवठा असल्यास एकच ओलीत ४०-४२ दिवसांनी, दोन ओलीतसाठी १८-२० व ६०-६५ दिवसांनी, तीन ओलीतसाठी १८-२०, ४०-४२ व ६०-६५ दिवसांनी संरक्षित ओलीत द्यावे. पिकास पेरणीवेळी ४०;४०;४० किलो नत्र; स्फुरद;पालाश / हे रासायनिक खत द्यावे तसेच उरलेले वरखत नत्र ४० किलो / हे १८-२० दिवसानंतर पहिल्या पाण्या च्या वेळी द्यावे. गहु पिकास पाण्याच्या उपलब्ध साठ्यानुसार पिकाच्या नाजूक अवस्थेत संरक्षित ओलीत द्यावे. |

| | | |
|---|---|---|
| हरभरा | वाढ | वेळेवर पेरणी केलेले पिक सुमारे ४५ ते ६० दिवस तणमुक्त असावे. गरज पडल्यास एक निंदन करून तण वेवास्थापन करावे. बागायती हरभरा पिकावरील ओली मुळकुज व कॉलररॉट दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी योग्य ते उपाय करावा. हरभरा जाकी - ९२१८ व विजय या वाणास शक्य तोवर तुषार सिंचन पद्धतीने संरक्षित ओलित करावे. |
| करडई | वाढ | संरक्षित ओलिताखाली करडई पिकाची आंतरमशागत करावी. गरज पडल्यास एक निंदन करून तण वेवस्थापन करावे. |
| रब्बी ज्वारी व मुक्का | वाढ | वेळेवर पेरणी केलेल्या पिकास पाण्याच्या उपलब्ध साठ्यानुसार संरक्षित ओलीत द्यावे. रब्बी ज्वारी पिकास रासायनिक वरखत उरलेले नत्र ४० किलो / हे २५-३० दिवसानंतर द्यावे. रब्बी मक्का पिकास रासायनिक वरखत उरलेले नत्र ४० किलो / हे २५ - ३० दिवसानंतर द्यावे. |
| फळझाडे | वाढ | कांदा पिकाची नर्सरी पेरणीस सुरवात करावी, त्या करिता शिफारस केलेली जात जसे अकोला सफेद, पुसा व्हाईट, रौंड फुले सफेद व श्वेता लाल कांद्या करिता फुले सुवर्ण व अर्क पितांबरी. मृग बहारातील फळांची वाढ वेगाने होण्याकरिता जिब्रेलिक अॅसिड १५ पीपीएम + मोनो-पोटॅशियम फॉस्फेट १% (१ किलो) १०० लिटर पाण्यात टाकून फवारणी करावी. |
| पशु व पक्षी | | जनावरांसाठी लिव्हर फ्ल्यू रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशु वैद्यकिय अधिकारी सल्ल्याने सर्व जनावरांना जंताचे औषध द्यावे. जनावरांना चा-यासाठी, पाण्याच्या उपलब्धतेनुसार एकदल वर्गीय (मका, ओट) व व्दिदल वर्गीय (लसुन, बरसीम) घासाची पेरणी करावी |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय, मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.